प्रवेशक, शास. अभि. महाविद्यालय / शास. तं. नि. मह. अभि. शिक्षक व प्रशा. सेवा गट'ब' आणि इतर तीन परीक्षा

A

2014 दि. १०/०८/२०१४ CODE : YO4

प्रश्नपुस्तिका क्रमांक

BOOKLET NO.

# प्रश्नपुस्तिका

चाळणी परीक्षा / SCREENING TEST

वेळ : 1 (एक) तास

एकूण प्रश्न : 100

एकूण गुण : 100

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 100 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | केंद्राची संकेताक्षरे ↑ | | | | | | शेवटचा अंक ↑ | |

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

SEAL

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

1. अलाहाबाद येथे अखिल भारतीय हिंदु महासभा स्थापन करण्यात आली कारण :

(a) ब्रिटिशांना विरोध करणे (b) हिंदुंचे धर्मांतर थांबविणे

(c) अस्पृश्यता निवारण करणे (d) काँग्रेसला मदत करणे

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) आणि (c) (2) (b) आणि (d) (3) (a) आणि (b) (4) (c) आणि (d)

---

2. म. फुलेंच्या मते जगात सत्यासारखा अन्य कोणताही धर्म नाही. ते म्हणतात सत्य म्हणजे :

(a) मानव धर्म (b) कृती (c) मुर्तिपुजा (d) समाजसेवा

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) आणि (b) (2) (c) आणि (d) (3) (a) आणि (c) (4) (a) आणि (d)

---

3. __________ या संस्थेचे सुरवातीला 'एकेश्वर भक्त मंडळी' असे नाव होते.

(1) आर्य समाज (2) प्रार्थना समाज (3) मानवधर्म सभा (4) परमहंस सभा

---

4. चलेजाव चळवळीत विदर्भातून पुढीलपैकी कोणत्या व्यक्तींनी महत्त्वाची भूमिका बजावली ?

(a) मदनलाल बागडी (b) विनायक दांडेकर (c) भास्करराव दूर्वे (d) डॉ. उत्तमराव पाटील

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) आणि (b) (2) (c) आणि (d) (3) (c) फक्त (4) (d) फक्त

---

5. बेहरामजी मलबारी या गृहस्थांनी कोणत्या विषयावर लॉर्ड रिपन यास निवेदने दिली ?

(a) सती विवाह (b) जरठ विवाह (c) बाल विवाह (d) सक्तीचे वैधव्य

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) फक्त (2) (b) फक्त (3) (c) आणि (d) (4) (d) फक्त

---

6. खालीलपैकी कोणते वृत्त महाराष्ट्राच्या भूप्रदेशाला छेदून जात नाही ?

(1) 72° रेखावृत्त (2) 16° अक्षवृत्त (3) 20° अक्षवृत्त (4) 76° रेखावृत्त

---

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**

7. जोड्या लावा :

| | शिखर | | उंची ( मी. ) |
|---|---|---|---|
| (a) | नाणेघाट | (i) | 1567 |
| (b) | साल्हेर | (ii) | 1293 |
| (c) | हरिश्चंद्रगड | (iii) | 1424 |
| (d) | शिंगी | (iv) | 1264 |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (i) | (iii) | (ii) |
| (2) | (iv) | (ii) | (i) | (iii) |
| (3) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (4) | (ii) | (i) | (iii) | (iv) |

---

8. 1 मे 1960 रोजी महाराष्ट्रात _________ जिल्हे आणि _________ तालूके होते.

(1) 25 आणि 335 (2) 26 आणि 335 (3) 25 आणि 235 (4) 26 आणि 235

---

9. पिवळसर तपकिरी मृदा महाराष्ट्रातील कोणत्या जिल्ह्यात आढळते ?

(1) सिंधुदुर्ग-रत्नागिरी-रायगड (2) कोल्हापूर-सांगली-सोलापूर

(3) नागपूर-भंडारा-चंद्रपूर (4) अमरावती-भुसावळ-जळगाव

---

10. नांदेड जिल्ह्याला कोणत्या जिल्ह्यांच्या सीमा आहेत ?

(1) यवतमाळ, परभणी, बीड, लातूर (2) हिंगोली, परभणी, बीड, लातूर

(3) चंद्रपूर, यवतमाळ, परभणी, लातूर (4) यवतमाळ, हिंगोली, परभणी, लातूर

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

11. खालील वाक्य वाचा :

(a) शासनाला कुणाच्याही खाजगीबाबीवर अतिक्रमण करण्याचा अधिकार नाही.

(b) शासनाकडे दैनंदिन शासकीय कामकाजाचा भाग म्हणून येणारी माहिती सार्वजनिक कामकाजाचा भाग म्हणून जमा केली जाते त्यामुळे अशी माहिती अर्जदारास मिळू शकते.

**पर्यायी उत्तरे :**

(1) वाक्य (a) बरोबर असून (b) चूक आहे.

(2) वाक्य (a) चूक असून (b) बरोबर आहे.

(3) वाक्ये (a) व (b) बरोबर आहेत.

(4) वाक्ये (a) व (b) चूक आहेत.

---

12. जोड्या लावा :

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | कलम - 15 | (i) | माहिती अधिकाऱ्याची नियुक्ती |
| (b) | कलम - 11 | (ii) | माहिती देण्यापासुनचा अपवाद |
| (c) | कलम - 8 | (iii) | राज्य माहिती आयोग |
| (d) | कलम - 5 | (iv) | त्रयस्त व्यक्तीची माहिती |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iii) | (iv) | (ii) | (i) |
| (2) | (iii) | (ii) | (iv) | (i) |
| (3) | (i) | (iii) | (iv) | (ii) |
| (4) | (ii) | (iii) | (iv) | (i) |

---

13. नेटवर्किंगच्या ओ एस् आय प्रतिकृती मध्ये ________ हा थर पॅकेट एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी, शक्यतो एकाधिक नेटवर्क अंतर्गत पोहचविण्याचे कार्य करतो.

(1) नेटवर्क थर

(2) दळणवळण/संपर्क थर

(3) संवाद थर

(4) सादरीकरण थर

---

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**

14. माहितीचा अधिकार हा यांना दिलेला आहे :
(1) केवळ नागरिकांना
(2) प्रत्येक व्यक्तीस
(3) वरीलपैकी दोन्ही
(4) वरीलपैकी एकही नाही

15. माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 या कायद्याची पूर्णपणे अंमलबजावणी __________ तारखेपासून (जम्मू आणि कश्मीर राज्य वगळता) पूर्ण देशभर सुरू झाली आहे.
(1) 15 जून 2005
(2) 15 ऑगस्ट 2005
(3) 12 ऑक्टोबर 2005
(4) वरीलपैकी कोणतीही नाही

16. खालील विधाने विचारात घ्या :
(a) नवीन राज्याच्या निर्मितीसंबंधी घटनादुरूस्ती विधेयक सर्वप्रथम लोकसभेत मांडावे लागते.
(b) अशा विधेयकास साध्या बहुमताने (simple majority) संसदेची मान्यता लागते.
(c) अशा विधेयकाबाबत संसदेच्या दोन्ही सभागृहामध्ये मतभेद निर्माण झाल्यास ते दूर करण्यासाठी संसदेचे संयुक्त अधिवेशन बोलावले जाते.
(d) राज्यसूचीतील विषयासंबंधी संसदेला कायदा करण्याचा जो अधिकार राज्यघटनेच्या कलम 249 अन्वये देण्यात आला आहे त्यासाठी राज्यसभेने ठराव मंजूर करून शिफारस करण्याची आवश्यकता नसते.

वरीलपैकी कोणते/कोणती विधान/विधाने **बरोबर** आहे/आहेत ?
(1) (a), (b), (c)
(2) (b), (c), (d)
(3) (b), (d)
(4) (b) फक्त

17. उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीचे पद रिक्त झाल्यास त्या पदाची कर्तव्ये हंगामी मुख्य न्यायमूर्ती म्हणून कोण पार पाडतात ?
(1) त्या न्यायालयातील सेवा ज्येष्ठ न्यायमूर्ती
(2) शेजारच्या राज्याच्या उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती
(3) त्या न्यायालयातील ज्या एकाची राज्यपाल नियुक्ती करतील ते न्यायमूर्ती
(4) त्या न्यायालयातील ज्या एकाची राष्ट्रपती नियुक्ती करतील ते न्यायमूर्ती

18. विधान परिषदेबाबत खालीलपैकी कोणती विधाने **सत्य** आहेत ?
(a) $\frac{1}{12}$ सदस्यांची निवड पदवीधरांकडून होते.
(b) सर्व पदवीधर या निवडणूकीत मतदान करू शकतात.
(c) जे निदान 3 वर्षे पदवीधर आहेत तेच या निवडणूकीत मतदान करू शकतात.
(d) जे निदान 5 वर्षे पदवीधर आहेत तेच या निवडणूकीत मतदान करू शकतात.

**पर्यायी उत्तरे :**
(1) (a) आणि (b)
(2) (a), (b) आणि (c)
(3) (a) आणि (d)
(4) (a) आणि (c)

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**

19. खालील विधाने विचारात घ्या :

(a) धर्मनिरपेक्ष राज्य म्हणजे राज्याचा अधिकृत असा धर्म नसणे.

(b) धर्मनिरपेक्ष राज्याला बळकटी आणणाऱ्या तरतूदी राज्यघटनेच्या कलम 15 (1) (2), 16(2), 29(2) आणि 325 यामध्ये आहेत.

(c) राज्यघटनेच्या कलम 25 ते 28 मध्ये धार्मिक स्वातंत्र्यासंबंधीचे हक्क आहेत.

(d) राज्यघटनेच्या कलम 30 मध्ये धार्मिक अल्पसंख्याकांना शैक्षणिक संस्था स्थापण्याचा व त्यांचे प्रशासन करण्याचा हक्क दिला आहे.

वरीलपैकी कोणते/कोणती विधान/विधाने **चुकीचे** आहे/आहेत ?

(1) (a) फक्त (2) (b) फक्त (c) (3) (d) फक्त (4) कोणतेही नाही

---

20. खालीलपैकी कोणते विधान **चूकीचे** आहे ?

(a) विधानसभेच्या अध्यक्ष किंवा उपाध्यक्षाला पदावरून दूर करण्याचा ठराव विचाराधीन असताना त्यांना अध्यक्षस्थान स्विकारता येत नाही.

(b) अध्यक्षास पदावरून दूर करण्याचा कोणताही ठराव विधानसभेत विचाराधीन असताना त्यांना विधानसभेमध्ये भाषण करण्याचा व तिच्या कामकाजात भाग घेण्याचा हक्क नसतो.

(c) अशा ठरावावर अध्यक्षांना फक्त पहिल्याच फेरीत मतदान करण्याचा हक्क असेल पण मते समसमान झाल्यास मात्र नाही.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) फक्त (2) (b) फक्त (3) (c) फक्त (4) कोणतेही नाही

---

21. संगणकातील OS याचे वर्णन खालीलपैकी कोणत्या प्रकारे करता येईल ?

(1) उपकरण (2) आज्ञावली (3) ऊर्जा साधन (4) वरीलपैकी नाही

---

22. _________ हे परिमाण आय बी एम् या संस्थेने निर्माण केले असून अमेरिकेच्या सरकारने त्याचा एक आदर्श सांकेतिक (एन्क्रिप्शन) परिमाण म्हणून अवलंब केला असून त्याचा उपयोग बिगर लष्करी आणि अवर्गीकृत कामासाठी केला जातो.

(1) डी ई एस् (2) ए ई एस् (3) आय पी (4) एस् आय पी

---

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**

23. http://www.nic.in हे कशाचे उदाहरण आहे ?

(1) युनिफॉर्म रिसोर्स लोकेटर
(2) सर्च इंजिन
(3) संस्थेचे नाव
(4) वरीलपैकी नाही

24. __________ ही एक सेवा आहे ज्याअंतर्गत उपभोक्ता पूर्ण कार्यक्षमतेने कल्पनांची देवघेव करू शकतो आणि चालू चर्चेमध्ये (इंटरनेट द्वारा) भाग घेऊ शकतो किंवा इतरांचे इलेक्ट्रॉनिक संभाषण ऐकू शकतो. ही सेवा समान आवड असणाऱ्या उपभोक्ता समुहाला प्रदान केली जाते.

(1) व्हिडीओ कॉन्फरन्सिंग
(2) ग्रुप मेल
(3) बुलेटीन बोर्ड सर्व्हिस
(4) ग्रुप वेअर

25. वेबपेजसाठी सर्वसाधारणपणे कोणते फाईल टाईप वापरतात ?

(1) BMP
(2) TXT
(3) HTML
(4) वरीलपैकी नाही

26. भारतीय राज्यघटनेतील __________ या अनुच्छेदाला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यघटनेचा आत्मा आणि प्राण असे संबोधले आहे.

(1) अनुच्छेद 14
(2) अनुच्छेद 15
(3) अनुच्छेद 21
(4) अनुच्छेद 32

27. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम हा __________ यावर्षी पारीत करण्यात आला.

(1) 2001
(2) 2005
(3) 2007
(4) 2009

28. __________ हा मानवी हक्क दिवस म्हणून साजरा केला जातो.

(1) 15 जानेवारी
(2) 20 मार्च
(3) 10 डिसेंबर
(4) 15 डिसेंबर

29. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचारास प्रतिबंध) अधिनियम 1989 नुसार सार्वजनिक अधिकाऱ्याने कर्तव्यास कसुर केल्यास त्यास पुढील शिक्षा होईल :

(1) एक महिना कैद
(2) सहा महिने कैद ते एक वर्ष कैद
(3) एक वर्ष कैद
(4) वरीलपैकी नाही

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

30. मानवी हक्क संरक्षण अधिनियम 1993 नुसार पुढील यंत्रणेची स्थापना झाली आहे.

(1) आंतरराष्ट्रीय मानव हक्क परिषद (2) राज्य मानव हक्क न्यायालय

(3) मानव हक्क संरक्षण परिषद (4) राष्ट्रीय मानव अधिकार आयोग

---

31. खालील विधाने विचारात घ्या :

(a) श्री. चंडीप्रसाद भट्ट यांना 2013 सालचा गांधी शांतता पुरस्कार जाहीर झाला आहे.

(b) श्री. चंडीप्रसाद भट्ट हे चिपको आंदोलनाचे प्रणेते म्हणून ओळखले जातात.

(c) श्री. चंडीप्रसाद भट्ट यांना भारत सरकारने पद्मश्री पुरस्काराने सन्मानीत केले आहे.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने **बरोबर** आहे/त ?

(1) (a) आणि (b) (2) फक्त (a) (3) फक्त (c) (4) (a) आणि (c)

---

32. 'ब्रिक्स' (BRICS) राष्ट्रांची 2013 पर्यंत पाच संमेलने पाच राष्ट्रांमध्ये पार पडलेली आहेत. त्याबाबतीत जोड्या लावा.

| | **वर्ष** | | **राष्ट्र** |
|---|---|---|---|
| (a) | 2009 | (i) | ब्राझील |
| (b) | 2010 | (ii) | रशिया |
| (c) | 2011 | (iii) | भारत |
| (d) | 2012 | (iv) | चीन |
| (e) | 2013 | (v) | द. अफ्रिका |

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** | **(e)** |
|---|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (i) | (iv) | (iii) | (v) |
| (2) | (i) | (ii) | (iii) | (iv) | (v) |
| (3) | (iii) | (i) | (ii) | (v) | (iv) |
| (4) | (ii) | (iv) | (i) | (v) | (iii) |

---

33. महाराष्ट्रातील 'पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम' योजनेबाबत खालील विधाने विचारात घ्या :

(a) सदर योजना ही एकूण तीन वर्षांसाठी आहे.

(b) नव्या निकषानुसार ग्रामपंचायतीवर दर पाच वर्षांनी त्यांच्या करांची फेर आकारणी करण्याचे बंधन आहे.

(c) नव्या निकषानुसार योजनेत सहभागी होवू इच्छिणाऱ्या गावाने गावातील एकूण लोकसंख्येइतकी झाडे पहिल्या वर्षी लावणे बंधनकारक.

(d) पहिल्या वर्षी किमान 60% कर वसूली करणे आणि 60% कुटुंबाकडे शौचालय असणे अनिवार्य.

वरीलपैकी कोणती विधाने **सत्य** आहेत ?

(1) (a), (b) (2) (a), (c), (d) (3) (b), (c), (d) (4) (a), (d)

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

34. 'युनिसेफ' (UNICEF) च्या प्रमुखपदी खालीलपैकी कोणाची पुर्ननेमणूक करण्यात आली आहे ?

(1) डॉ. अनिया ग्रोबीकी (2) विल्यम लॅसी स्वींग

(3) अँथनी लेक (4) प्रा. अनंथ दुराईप्पा

35. 2014 चा 'पुलित्झर' पुरस्कार जन्माने भारतीय असलेले अमेरिकी विजय शेषाद्री यांना कशाकरिता प्राप्त झाला आहे ?

(1) कादंबरी (2) कविता (3) नाटक (4) जीवन चरित्र

36. 'निर्मल भारत अभियान' योजनेबाबत खालीलपैकी कोणते विधान **बरोबर** नाही ?

(1) दारिद्र्य रेषेवरील अनु. जाती, अनु. जमाती कुटुंबासदेखील वैयक्तिक स्वच्छतागृह बांधून वापर सुरू केल्यास रुपये 4600/- प्रोत्साहनपर अनुदान.

(2) सार्वजनिक ठिकाणी शौचालय युनिट बांधण्यासाठी ग्रामपंचायतींना जास्तीत जास्त रु. 1 लाख 80 हजार पर्यंत अनुदान.

(3) शाळा व अंगणवाडी स्वच्छतागृहासाठी प्रतियुनिट नुसार अनुदान.

(4) घनकचरा व सांडपाणी यांचे शास्त्रीयदृष्ट्या व्यवस्थापन करण्यासाठी ग्रामपंचायतींना लोकसंख्येच्या प्रमाणात अनुदान.

37. 2014 फीफा (FIFA) विश्वकप स्पर्धेत गतविजेत्या स्पेनचे आव्हान साखळीतच ज्या सामन्यात संपुष्टात आले तो सामना प्रतिस्पर्धी कोणत्या देशाने जिंकला ?

(1) नेदरलँड (2) ब्राझील (3) चिली (4) ऑस्ट्रेलिया

38. महाराष्ट्रातील 'सुवर्णजयंती राजस्व अभियाना' बाबतीत खालील विधाने विचारात घ्या :

(a) हे अभियान राज्यात 1 एप्रिल 2011 पासून राबविण्यात आले.

(b) अभियानामार्फत पाणंद रस्त्यांचे प्रश्न सोडविले गेले.

(c) रहिवाशी प्रमाणपत्र व अन्य दाखल्यांचा प्रश्न सुटला.

(d) भूमी अभिलेखांचे आधुनिकीकरण व व्यवस्थापन करणे हा या अभियानाचा उद्देश्य आहे.

वरीलपैकी कोणती विधाने **सत्य** आहेत ?

(1) (a) आणि (b) (2) (b) आणि (c) (3) (a), (b) आणि (c) (4) (b), (c) आणि (d)

39. खालील विधाने विचारात घ्या :

(a) युनेस्कोने जागतिक वारसा म्हणून मान्यता दिलेल्या पश्चिम घाटातील 39 स्थळांपैकी सर्वाधिक स्थळे केरळमध्ये तर सर्वात कमी स्थळे महाराष्ट्रात आहेत.

(b) युनेस्कोने महाराष्ट्रातील चार स्थळे हॉट स्पॉट (संवेदनशील) म्हणून जाहिर केली आहेत.

(c) पश्चिम घाट पर्यावरण तज्ञ मंडळाचे डॉ. माधवराव चितळे अध्यक्ष होते.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने **बरोबर** आहे/त ?

(1) (a) आणि (b) (2) (b) आणि (c) (3) (a) आणि (c) (4) फक्त (c)

---

40. याकोव सिनाई यांच्या संदर्भात खालील विधाने विचारात घ्या :

(a) ते गणितज्ञ आहेत.

(b) त्यांना 2014 चे एबल पारितोषिक जाहीर झाले आहे.

(c) 1963 मध्ये त्यांनी 'सिनाई-बिलीअर्ड' नावाने प्रसिद्ध असलेला सिद्धांत मांडला.

(d) त्यांनी 250 हून अधिक शोध निबंध लिहीले आहेत.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने **बरोबर** आहे/त ?

(1) फक्त (b) (2) (a) आणि (b)

(3) (a) आणि (d) (4) (a), (b), (c) आणि (d)

---

41. डावीकडील चौरसातील वर्णाक्षरे परस्परांमध्ये जो संबंध दर्शवतात तोच संबंध उजवीकडील चौरसातील वर्णाक्षरात आहे. तर प्रश्नचिन्हासाठी वर्णाक्षर निवडा –

| | | |
|---|---|---|
| C | G | B |
| E | Q | C |
| D | S | D |

| | | |
|---|---|---|
| B | K | E |
| F | ? | C |
| B | Q | G |





(1) T (2) R (3) S (4) U

---

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**

42. सोबत दिलेली अनिर्देशित प्रतिमा कोणत्या नामनिर्देशित प्रतिमेची फक्त प्रतलात फिरवून आरशातील प्रतिमा ठरू शकेल?



(1)  (2)  (3)  (4) 

---

43. पुढे विधान, गृहीतके व त्यापुढे अंतर्निहीत गृहीतकांचे पर्याय दिले आहेत. त्यातील उचित पर्याय निवडा -

**विधान :** मतदार म्हणतात, ''आम्ही यांना निवडून दिल्यास ते आम्हाला चांगले दिवस दाखवतील.''

**गृहीतके :**

(a) निवडून दिलेल्या नेत्यांच्या हातात कारभाराच्या नाड्या आल्या की ते जनतेला हव्या त्या सुविधा त्वरित, विनामोबदला व विनासायास देऊ शकतात.

(b) नेत्यांनी मनात आणलं तर ते कोणताही चमत्कार घडवून आणू शकतात त्यामुळे ते देवासमान असतात.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त गृहीतक (a) अंतर्निहीत

(2) फक्त गृहीतक (b) अंतर्निहीत

(3) गृहीतके (a) व (b) दोन्ही अंतर्निहीत आहेत.

(4) गृहीतके (a) व (b) एकही अंतर्निहीत नाही.

---


44. विसंगत अंकसमूह कोणता?





(1) 52923 (2) 44121 (3) 78428 (4) 47632

---

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**

**45.** मालिकेसाठी सहावी प्रतिमा निवडा -



(1)  (2)  (3)  (4) 

---

**46.** दिलेल्या व्याख्येच्या आधारे अचूक पर्याय निवडा :

हमी देणे म्हणजे उत्पादनाच्या गुणवत्तेबाबत प्रमाणित वचन वा खात्री देणे होय. उत्पादक ही हमी लेखी देतो वा उत्पादन विक्रेता ही हमी तोंडी देतो.

पुढीलपैकी कोणता प्रसंग हमीचे सर्वोत्तम निर्देशन करतो ?

(1) दागिने विक्रेत्याने सलमाला खरेदीसंबंधाने हमीपत्र घेण्याची सूचना दिली.


(2) महत्त्वने कलिकाला जुना कॅमेरा घेऊन दिला व तो चांगल्या स्थितीत नसल्यास त्याची किंमत परत मिळवून देईन असे आश्वासन दिले.





(3) मनुजा जुन्या मोटार सायकली दुरुस्त करुन, वापरण्यायोग्य करुन त्यांची विक्री करण्यात पटाईत आहे.

(4) मेरीने सुधाला मोटार सायकल खरेदी करताना लेखी हमी घेण्यासाठी बजावले.

---

**47.** प्रश्नचिन्हा ऐवजी उचित पर्याय निवडा -



(1)  (2)  (3)  (4) 

---

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**

48. प्रश्नचिन्हांच्या जागी उचित पर्याय जोडी निवडा -

BZDYGWKT ? ?

(1) PP (2) PQ (3) PO (4) OP

49. खालीलपैकी कोणते इंग्रजी वर्णाक्षर एका अक्षराच्या डावीकडे लागून आहे जे एका अक्षराच्या डावीकडून दुसरे आहे जे F च्या उजवीकडून दुसऱ्या व D च्या डावीकडून दुसऱ्या अक्षरांच्या मधोमध आहे?

(1) A (2) B (3) C (4) D

50. प्रश्नचिन्हासाठी पर्याय निवडा -

जर 23430 ⇒ 50324

जर 19825 ⇒ 25918

तर 83056 ⇒ ?

(1) 89149 (2) 56834

(3) संख्यांची रचना वैशिष्ट्यपूर्ण नाही (4) 56380

51. सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजनेसाठी अर्ज करण्यास इयत्ता 12 वी वार्षिक परिक्षेत किमान किती टक्के गुण मिळाल्या नंतर अर्ज करता येतो?

(1) 70% (2) 80% (3) 60% (4) 75%

52. महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, 1994 च्या कलम 8(1) नुसार कोणाच्या पूर्व परवानगी शिवाय विद्यापीठ अध्यापकांची अधिकाऱ्यांची किंवा इतर कर्मचाऱ्यांची नवीन पदे निर्माण करणार नाही?

(1) विद्यापीठ अनुदान आयोग (2) केंद्र शासन

(3) राज्य शासन (4) कुलपती

53. म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 च्या नियम 15 अनुसार तात्पुरत्या सेवेच्या संबंधात वेळेत वैद्यकीय प्रमाणपत्र दाखल केल्याखेरीज त्या व्यक्तीला सेवेत चालू ठेवले जात नाही हे पाहण्याची जबाबदारी कोणत्या अधिकाऱ्याची आहे?

(1) आहरण आणि संवितरण अधिकारी (2) लेखा अधिकारी

(3) कार्यालय प्रमुख (4) वैद्यकीय अधिकारी

54. म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 च्या नियम 11(1) अनुसार शासकीय कर्मचाऱ्याने त्याच्या नियुक्तीच्या तारखेपासून त्याची किती कालावधीची सेवा पूर्ण होण्यापूर्वी आरोग्याबद्दलचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर केले पाहिजे?

(1) 3 महिने (2) 6 महिने (3) 9 महिने (4) 12 महिने

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**

55. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, 1979 च्या कोणत्या नियमान्वये शासकीय कर्मचाऱ्यास ज्या संघटनेची उद्दिष्ट्ये किंवा कार्य भारताच्या सार्वभौमत्वाला आणि एकात्मतेला किंवा सुव्यवस्थेला किंवा नैतिक मूल्यांना बाधक असतात, अशा संघटनेचा सदस्य राहण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे?

(1) नियम 6 (2) नियम 7 (3) नियम 8 (4) नियम 9

---

56. महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, 1981 च्या नियम 81 अनुसार शासकीय कर्मचाऱ्यास कोणत्याही एका वेळी सर्वसाधारणपणे किती महिने अध्ययन रजा मंजूर करता येईल?

(1) 6 महिने (2) 12 महिने (3) 18 महिने (4) 24 महिने

---

57. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, 1982 च्या नियम 48 अनुसार कोणत्या प्राधिकाऱ्याच्या आदेशाद्वारे शासकीय कर्मचाऱ्याच्या सेवेतील खंड क्षमापित करता येऊ शकतो?

(1) विभाग प्रमुख (2) प्रशासकीय प्राधिकारी

(3) नियुक्ती प्राधिकारी (4) लेखा अधिकारी

---

58. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम, 1982 च्या कोणत्या नियमानुसार राजपत्रित शासकीय कर्मचाऱ्याच्या बाबतीत त्याच्या सेवानिवृत्तीच्या तारखेपासून एक आठवड्याच्या आत शासकीय राजपत्रात अधिसूचना देण्यात येते?

(1) नियम 135(ए) (2) नियम 135(बी) (3) नियम 135(सी) (4) नियम 135(डी)

---

59. महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, 1981 च्या नियम 62 (सी) नुसार शासकीय कर्मचाऱ्याच्या संपूर्ण सेवेच्या कालावधीतील अनर्जित रजेची कमाल मर्यादा किती आहे?

(1) 90 दिवस (2) 180 दिवस (3) 360 दिवस (4) 365 दिवस

---

60. केंद्र शासन पुरस्कृत अल्पसंख्यांक पोस्टमॅट्रिक शिष्यवृत्ती योजना 2007/08 पासून राज्यात उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण/2007 (542/07)/ताशि 1 दि. 21 जानेवारी 2008 नुसार सुरू झालेली आहे. सदरची योजना खालीलपैकी कोणत्या अल्पसंख्यांक समुदायातील विद्यार्थ्यांसाठी लागू करण्यात आली आहे?

(1) मराठी, मल्याळी, हिंदी, गुजराती (2) मुस्लिम, मराठा, हिंदू

(3) मुस्लिम, पारसी, शीख, ख्रिश्चन, बौद्ध (4) जैन, मराठा, इंग्रजी

---

61. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, 1979 च्या कोणत्या नियमातील तरतूदी नुसार प्रत्येक शासकीय कर्मचारी त्याची कोणत्याही सेवेत किंवा पदावर प्रथम नियुक्ती झाल्यानंतर, शासनाने विहित केलेल्या नमुन्यातील त्याच्या स्थावर जंगम व मौल्यवान मालमत्तेचे व दायित्वाचे विवरण सादर करील?

(1) नियम 18 (2) नियम 19 (3) नियम 20 (4) नियम 21

---

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**

62. महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, 1979 अंतर्गत शिस्तभंग विषयक प्राधिकरणाने दिलेले आदेश व केलेल्या चौकशीच्या आदेशाची प्रत शासकीय कर्मचाऱ्यास देणे कोणत्या नियमानुसार आवश्यक आहे ?

(1) नियम 9 (2) नियम 10 (3) नियम 11 (4) नियम 12

63. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम 1979 च्या कोणत्या नियमानुसार शासकीय कर्मचाऱ्यास शासनाच्या पूर्वपरवानगी खेरीज कोणताही खाजगी व्यापार किंवा दुसरी कोणतीही नोकरी स्विकारता येत नाही ?

(1) नियम 14(1) (2) नियम 15(1) (3) नियम 16(1) (4) नियम 17(1)

64. आदिवासी विकास विभागाच्या दिनांक 9 ऑगस्ट, 2004 च्या शासन निर्णयानुसार अनुसूचित जमातीसाठी भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना व शिक्षण शुल्क परीक्षा शुल्क देण्याच्या योजनेंतर्गत मान्यता प्राप्त विना अनुदानित महाविद्यालयातील व परराज्यात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काची रक्कम मंजूर करण्याचे अधिकार कोणाला आहेत ?

(1) संबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य
(2) जिल्हाधिकारी
(3) अपर आयुक्त, आदिवासी विकास
(4) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प

65. महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, 1981 च्या नियम, 36 अनुसार वैद्यकीय मंडळाच्या रचनेत मुंबई विभाग सोडून इतर महसूल विभागांसाठी नियम 34 मध्ये उल्लेखिलेल्या मंडळांमध्ये तीन अर्हताप्राप्त डॉक्टरांचा समावेश असेल. त्यापैकी एक विभागीय मुख्यालयातील जिल्हा शल्य चिकित्सक असेल, तो मंडळातील कोणते पद धारण करेल ?

(1) सचिव (2) अध्यक्ष (3) सदस्य (4) तज्ञ सदस्य

66. महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, 1994 च्या कलम 56 अन्वये राज्य शासनाने, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे स्थापन केलेल्या महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण परिषदेच्या अध्यक्षपदी कोण असेल ?

(1) कुलपती
(2) मुख्यमंत्री
(3) कुलगुरु
(4) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री

67. विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम, 1956 च्या कलम 4(2) अनुसार विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अध्यक्ष पदावर कोणत्या सेवेतील व्यक्तीची निवड करता येत नाही ?

(1) विश्व विद्यालय (2) केंद्र सरकार (3) कृषि क्षेत्र (4) वाणिज्य क्षेत्र

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**

68. सेंट्रल सेक्टर स्कॉलरशिप केंद्र पुरस्कृत योजनेखाली इयत्ता 12 वी उत्तीर्ण विद्यार्थ्यास पालकाचे उत्पन्न रु. सहा लाखापेक्षा कमी असल्यास व विशिष्ट टक्के गूण मिळाल्यास दरवर्षी पदवीपर्यंत व पदव्युत्तर शिक्षणासाठी किती शिष्यवृत्ती दिली जाते ?

(1) पदवी अभ्यासक्रमासाठी दरवर्षी रु. 10,000/- पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी दरवर्षी रु. 20,000/- शिष्यवृत्ती दिली जाते.

(2) पदवी अभ्यासक्रमास दरवर्षी रु. 50,000/- व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी दरवर्षी रु. 1 लक्ष.

(3) पदवी अभ्यासक्रमास दरवर्षी रु. 4,000/- व पदव्युत्तर अभ्यासक्रमास दरवर्षी रु. 6,000/-

(4) पदवी अभ्यासक्रमास दरवर्षी रु. 20,000 व पदव्युत्तर अभ्यासक्रमास दरवर्षी रु. 90 हजार

---

69. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, 1979 च्या कोणत्या नियमानुसार कोणताही शासकीय कर्मचारी त्याने धारण केलेल्या कोणत्याही न्यायिक किंवा कार्यकारी पदामुळे कोणतेही खाजगी प्रकरण कोणत्याही स्वरूपात त्याच्यापुढे आल्यास, अशा प्रकरणामध्ये लवाद म्हणून काम करू शकणार नाही ?

(1) नियम 20 (2) नियम 21 (3) नियम 22 (4) नियम 23

---

70. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णय दिनांक 4 मार्च, 2014 च्या परिच्छेद (ड) (6) नुसार मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती करण्याची योजना कोणत्या कोट्यातून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनाच लागू राहील ?

(1) राखीव (2) शासकीय (3) व्यवस्थापन (4) अनिवासी भारतीय

---

71. आदिवासी विकास विभागाच्या दिनांक 9 ऑगस्ट, 2004 च्या शासन निर्णयाच्या परिच्छेद 3.93 नुसार अनुसूचित जमातीसाठी भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना व शिक्षण शुल्क परीक्षा शुल्क देण्याच्या संदर्भात संबंधित कनिष्ठ महाविद्यालये विद्यार्थ्यांच्या अर्जाच्या अनुषंगाने त्या त्या वर्षी लागणाऱ्या शिष्यवृत्तीच्या तरतूदीची अंतिम एकूण मागणी कोणत्या तारखेपूर्वी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांच्याकडे करतील ?

(1) दि. 15 जानेवारी (2) दि. 15 मार्च (3) दि. 15 जुलै (4) दि. 15 नोव्हेंबर

---

72. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, 1982 च्या नियम 54(1) अनुसार शासकीय कर्मचाऱ्याने निवृत्तिवेतनासाठी केलेल्या अर्हताकारी सेवेतील कमतरता क्षमापित करणे किंवा नियम 54(2) नुसार सेवेमध्ये भर घालणे या अधिकाराचा वापर कोणत्या निवृत्तिवेतनावर सेवानिवृत्त होणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्याबाबत करण्यात यावा ?

(1) नियत वयोमान निवृत्तिवेतन (2) पूर्ण सेवा निवृत्तिवेतन

(3) रूग्णता निवृत्तिवेतन (4) अनुकंपा निवृत्तिवेतन

---

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**

73. महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, 1981 च्या नियम, 41 अनुसार अराजपत्रित शासकीय कर्मचाऱ्याने वैद्यकीय कारणास्तव रजेकरिता केलेल्या अर्जासोबत प्राधिकृत वैद्यकीय अधिकाऱ्याचे कोणत्या नमुन्यात दिलेले वैद्यकीय प्रमाणपत्र जोडले पाहिजे ?

(1) परिशिष्ट 5 मधील नमुना 4
(2) परिशिष्ट 5 मधील नमुना 5
(3) परिशिष्ट 5 मधील नमुना 6
(4) परिशिष्ट 5 मधील नमुना 7

---

74. महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, 1981 च्या कोणत्या नियमान्वये शासकीय कर्मचाऱ्याला देय असलेल्या अर्धवेतनी रजेच्या निम्मी परावर्तीत रजा मंजूरीसाठी वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे ?

(1) नियम 60(1)
(2) नियम 61(1)
(3) नियम 62(1)
(4) नियम 63(1)

---

75. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती), नियम 1981 च्या नियम 9(14) (ई) नुसार शासकीय कर्मचाऱ्याला प्रत्येक सक्तीच्या परिक्षेसाठी परिक्षेच्या ठिकाणी जाण्याचा व तेथून येण्याचा रास्त वेळ जमेस धरून लागणारा कालावधी कर्तव्य कालावधी म्हणून गणण्याची सवलत किती वेळा देता येते ?

(1) 1 वेळा
(2) 2 वेळा
(3) 3 वेळा
(4) 5 वेळा

---

76. आदिवासी विकास विभागाच्या शासन निर्णय दिनांक 9 ऑगस्ट 2004 च्या परिच्छेद (3.2) नुसार अनुसूचित जमातीसाठी भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेखाली नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र भरून घेण्याची संपूर्ण जबाबदारी कोणाची आहे ?

(1) प्रकल्प अधिकारी
(2) जिल्हाधिकारी
(3) संबंधित शिक्षण संस्था
(4) लेखा परिक्षण अधिकारी

---

77. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम, 1982 च्या नियम 132(2) अन्वये शासकीय कर्मचाऱ्याच्या सेवानिवृत्तीच्या तारखेपर्यन्त शासनाला येणे असलेल्या शिल्लक रक्कमा त्याला देय असलेल्या कोणत्या रक्कमेशी समायोजित करण्यात येतात ?

(1) भविष्य निर्वाह निधी
(2) मृत्यू-नि. सेवानिवृत्ती उपदान
(3) सेवानिवृत्ती वेतन
(4) गट विमा योजना अंतर्गत देय रक्कम

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

78. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, 1982 च्या नियम 125 अनुसार कार्यालय प्रमुख, नियम 132 अनुसार शासनाला येणे असलेल्या रकमांबद्दल खात्री करून घेतल्यानंतर व त्या निर्धारित केल्यानंतर त्यांचा तपशील, शासकीय कर्मचाऱ्याच्या सेवानिवृत्तिच्या तारखेच्या किमान किती महिने अगोदर लेखा परिक्षा अधिकाऱ्याकडे प्रस्तुत करील ?

(1) एक महिना (2) दोन महिने (3) तीन महिने (4) चार महिने

---

79. महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, 1979 च्या नियम 19 अन्वये अपीलकर्त्याला आदेशाची प्रत मिळाल्यापासून अपील करण्यासाठी किती दिवसांचा कालावधी विहित करण्यात आला आहे ?

(1) 30 दिवस (2) 45 दिवस (3) 60 दिवस (4) 90 दिवस

---

80. विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम, 1956 च्या कलम 4(ख) अनुसार विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सदस्य पदावर निवड होताना कमीत कमी किती सदस्य विश्वविद्यालयाचे शिक्षक असले पाहिजेत ?

(1) 2 (2) 3 (3) 4 (4) 5

---

81. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम, 1982 च्या नियम 120 (1) अनुसार प्रत्येक कार्यालय प्रमुखाने त्यांच्या आस्थापनेवरून नियत वयमान सेवानिवृत्त होणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्याची त्याच्या सेवानिवृत्तीच्या तारखेच्या दोन वर्षे अगोदर निवृत्ती वेतन विषयक कागदपत्रे कोणत्या नमुन्यात तयार करण्याचे काम हाती घेतले पाहिजे ?

(1) नमुना 6 (2) नमुना 7 (3) नमुना 8 (4) नमुना 9

---

82. महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम 1981 च्या नियम 26(1) नुसार कोणत्या प्राधिकाऱ्याकडून रजेच्या अनुज्ञेयतेबद्दलचा अहवाल प्राप्त झाल्याखेरीज रजा मंजूर करता येत नाही ?

(1) कार्यालय प्रमुख (2) रजेचा हिशोब ठेवणारा प्राधिकारी

(3) आहरण व संवितरण अधिकारी (4) आस्थापना अधिकारी

---

83. महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, 1979 च्या कोणत्या नियमांन्वये शासकीय कर्मचाऱ्याला वाजवी व पुरेशा कारणांकरिता किरकोळ स्वरूपाच्या किंवा जबर शिक्षा करता येतील ?

(1) नियम 5 (2) नियम 6 (3) नियम 7 (4) नियम 8

---

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**

84. म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 च्या नियम 9(50) अनुसार निर्वाह भत्ता म्हणजे काय?

(1) शासकीय कर्मचाऱ्याला सेवानिवृत्ती नंतर दिली जाणारी मासिक रक्कम

(2) वैद्यकीय रजेवर असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यास दिली जाणारी मासिक रक्कम

(3) ज्या शासकीय कर्मचाऱ्याला वेतन किंवा रजावेतन मिळत नाही त्याला दिली जाणारी मासिक रक्कम

(4) बदली झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यास दिली जाणारी मासिक रक्कम

---

85. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, 1979 अंतर्गत शासकीय कर्मचाऱ्यास त्याच्या शासकीय सेवेसंबंधी कोणत्याही वरिष्ठ प्राधिकरणावर कोणताही राजकीय किंवा इतर बाह्य दबाव आणण्यास कोणत्या नियमान्वये प्रतिबंध करण्यात आला आहे?

(1) नियम 21 (2) नियम 22 (3) नियम 23 (4) नियम 24

---

86. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक 4 मार्च, 2014 च्या शासन निर्णयाच्या परिच्छेद (ड) (3) अनुसार विमुक्त जाती भटक्या जमाती, विशेष मागास वर्ग व इतर मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांच्या पालकांच्या वार्षिक उत्पन्नाची मर्यादा किती आहे?

(1) 2.50 लाख (2) 3.00 लाख (3) 4.00 लाख (4) 4.50 लाख

---

87. महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, 1981 च्या नियम 66 नुसार निवृत्तिपूर्व रजा मंजूर करणारा सक्षम प्राधिकारी, देय अर्धवेतनी रजेसह जास्तीत जास्त 240 दिवसांच्या देय अर्जित रजे इतकी निवृत्तिपूर्व रजा घेण्यास शासकीय कर्मचाऱ्यास परवानगी देऊ शकेल मात्र रजेचा एकूण कालावधी किती महिन्यांपेक्षा अधिक होता कामा नये?

(1) 24 महिने (2) 26 महिने (3) 28 महिने (4) 30 महिने

---

88. महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, 1994 च्या कलम 42 अनुसार या अधिनियमा अन्वये घटित करण्यात आलेल्या प्रत्येक प्राधिकरणाची मुदत कधीपासून सुरु होईल आणि उक्त दिनांकापासून ती पाच वर्षांची असेल?

(1) 1 जानेवारी (2) 1 एप्रिल (3) 1 जुलै (4) 1 सप्टेंबर

---

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**

89. महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, 1994 च्या कलम 23 अनुसार विद्यापीठाचे सर्व वेतनी अधिकारी त्याच्या प्राधिकरणांचे, समित्यांचे किंवा संस्थांचे सदस्य, त्यांचे अध्यापक आणि अन्य कर्मचारी हे, भारतीय दंड संहितेच्या कोणत्या कलमाच्या अर्थांतर्गत लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल ?

(1) कलम 20 (2) कलम 21 (3) कलम 22 (4) कलम 23

---

90. महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, 1979 च्या नियम 23 अनुसार निलंबनाच्या आदेशाविरूद्ध केलेल्या अपीलाच्या बाबतीत अपीलीय प्राधिकरण या नियमांतील कोणत्या नियमाच्या तरतूदींना अनुलक्षून आणि प्रकरणाची परिस्थिती विचारात घेऊन, निलंबनाचा आदेश समर्थनीय आहे किंवा नाही यावर विचार करील ?

(1) नियम 4 (2) नियम 5 (3) नियम 6 (4) नियम 7

---

91. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, 1979 च्या नियम 27 अन्वये कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्यास काय घेण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे ?

(1) मादक औषधिद्रव्ये सेवन (2) देणगी

(3) तसबीर (4) हुंडा

---

92. विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम, 1956 च्या कलम 6 (ग) अनुसार विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सदस्य पदावरील नियुक्तीचा कालावधी किती असतो ?

(1) 5 वर्षे (2) 3 वर्षे (3) 2 वर्षे (4) 1 वर्ष

---

93. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक 4 मार्च, 2014 च्या शासन निर्णयाच्या परिच्छेद (ड) (4) अनुसार राज्यातील मान्यता प्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमध्ये प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या इतर मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्काची किती टक्के प्रतिपूर्ती अनुज्ञेय असते ?

(1) 25% (2) 50% (3) 75% (4) 100%

---

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**

94. महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, 1994 च्या कलम 12(क) अनुसार कुलगुरुच्या नियुक्तीसाठी योग्य अशा नावांची शिफारस करण्याकरिता किती सदस्यांचा समावेश असलेली एक समिती असेल?

(1) 5 सदस्य (2) 6 सदस्य (3) 7 सदस्य (4) 8 सदस्य

---

95. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, 1979 च्या कोणत्या नियमान्वये कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्यास निदर्शने आणि संप करण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे?

(1) नियम 6 (2) नियम 7 (3) नियम 8 (4) नियम 9

---

96. विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम, 1956 च्या कलम 4 अनुसार विद्यापीठ अनुदान आयोगाच्या संरचनेत एक अध्यक्ष, एक उपाध्यक्ष यांच्या व्यतिरिक्त अन्य किती सदस्य असतात?

(1) 5 सदस्य (2) 7 सदस्य (3) 10 सदस्य (4) 12 सदस्य

---

97. एकलव्य आर्थिक सहाय्य योजना शासननिर्णय उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवा योजना विभागाचा शासन निर्णय क्र. एस सी एच 1095/(81) मशि-4 दि. 7 फेब्रुवारी 1996 नुसार कोणत्या अभ्यासक्रमासाठी आर्थिक सहाय्य म्हणून सुरू केलेली आहे?

(1) पदवी पर्यंतचे शिक्षण घेणे सुलभ व्हावे म्हणून

(2) इयत्ता 11 वी 12 वी पर्यंतचे शिक्षण घेणे सुलभ व्हावे म्हणून

(3) पदव्युत्तर शिक्षण घेणे सुलभ व्हावे म्हणून

(4) प्राथमिक शिक्षण घेणे सुलभ व्हावे म्हणून

---

98. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक 4 मार्च, 2014 च्या शासन निर्णयाच्या परिच्छेद (ड) (2) नुसार राज्यातील मान्यता प्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्काची किती टक्के प्रतिपूर्ती अनुज्ञेय असते ?

(1) 50% (2) 75% (3) 100% (4) 25%

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

99. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, 1981 च्या कोणत्या नियमान्वये एखादे स्थायी पद कायमपणे धारण करणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्याचा त्या स्थायी पदावरील त्याचा धारणाधिकार सक्षम प्राधिकारी निलंबित करील ?

(1) नियम 22 (2) नियम 23 (3) नियम 24 (4) नियम 25

100. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, 1981 च्या 9 (44) नुसार राज्याच्या एकत्रित निधीमध्ये निर्दिष्ट केलेला निधी वगळून, एखाद्या राज्य शासनाला किंवा त्यांच्या वतीने मिळालेला इतर सर्व प्रकारचा सरकारी निधी म्हणजे काय ?

(1) राज्याचा एकत्रित निधी
(2) विशेष लेखा
(3) अधिदान व लेखा
(4) राज्याचा लोक लेखा

-oOo-

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**

## सूचना — (पृष्ठ 1 वरून पुढे....)

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षा कक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

## नमुना प्रश्न

प्र. क्र. 201. आधुनिक विचारसरणीनुसार शिक्षणाच्या प्रक्रियेतील केंद्रबिंदु कोण?

(1) शिक्षण संस्था (2) शिक्षक

(3) विद्यार्थी (4) अभ्यासक्रम

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) विद्यार्थी" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. 201 समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्र. क्र. 201. ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**

SEAL